| | |
|---|---|
| **MHNS230044922025** | **कौ.हिं.म.सं.अर्ज क्र.६३/२०२५<br>निशा गायकवाड वि. ज्ञानेश्वर गायकवाड** |

## निशाणी क्र.५ वरील आदेश

(पारीत दिनांक ३० मार्च २०२६)

सदरचा अर्ज हा अंतरिम दिलासे मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**१.** प्रस्तूत अर्जाव्दारे अर्जदार असे कथन करते की, तिचे लग्न दि. १७.०५.२०१६ रोजी गैरअर्जदार क्र.१ सोबत बौद्ध धर्मानुसार व समाजाच्या चालीरिती रिवाजानुसार मौजे गोंदु दुमाला, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथे संपन्न झाले असून सदर लग्नसंबंधातून उभयतांस काहीएक अपत्य झालेले नसून उभयतांचे पती पत्नीचे विवाह संबंध अद्यापपावेतो कायम व अस्तित्वात आहेत. अर्जदाराचे वडिलांनी जवळपास ४ लाख रूपये खर्च करून सदरचा लग्न सोहळा मोठ्या आनंदात व थाटामाटात पार पाडलेला असून अर्जदार ही गैरअर्जदारांच्या घरी नांदावयास गेली. सुरूवातीचे एक ते दोन महिने गैरअर्जदारांनी तिला चांगले वागविले. परंतु, त्यानंतर तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यास सूरूवात केली. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र. १ हा नाशिक येथे फ्लॅट घेण्यासाठी तिचे आईवडिलांकडून ३५ लाख रूपये घेवून ये अशी वारंवार धमकी देवून बेकायदेशीर रक्कमांची मागणी करत असे तसेच गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे 'तु माहेरून पैसे आणले तर आम्ही तुला नांदवू नाहीतर तु येथे राहायचे नाही' असे म्हणून तिचा शारिरिक व मानसिक छळ करत असे. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना दारूचे तिव्र प्रमाणात व्यसन असल्याने गैरअर्जदार हे रोज दारू पिवुन येवून अर्जदाराची काही एक चुक नसतांना तिला लाथाबुक्यांनी मारहारण करत असे व तिला अश्लिल शिवीगाळ करत असे. गैरअर्जदार अर्जदारास म्हणत असे की, आम्ही तुला घर काम करण्यासाठी मोलकरीण म्हणून आणले आहे. अर्जदाराची सासू ही सतत बोलत असे की, तिला फारकत देवून टाक, हि नको आपल्याला हिला सोडून देवू हिला मुलबाळ होत नाही, वांझोटी मेली माझ्या मुलाचे

नशिब फुटके, असे बोलून अर्जदाराचे केस पकडून तिस मारझोड करत असे. अर्जदारास गैरअर्जदार यांनी घराबाहेर हाकलून दिल्यानंतर अर्जदार तिचे माहेरी आल्यानंतर तिच्या आईवडिलांनी गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांच्या सततच्या बोलण्यावरून तिस मुंबई येथील नाहुर यशोदा हॉस्पीटल, जि.ठाणे येथे डायव्हर्स स्कुपी(गर्भपिशवी) ऑपरेशन केले असून सदरील दवाखान्याचा संपूर्ण खर्च अर्जदाराचे आईवडिलांनीच केला. गैरअर्जदार यांना ऑपरेशनबाबत कळविले असता तरी देखील गैरअर्जदार हे अर्जदारास बघण्यासाठी आले नाही अथवा तिची तब्येतीची विचारपुस केली नाही. गैरअर्जदार क्र.३ यास देखील दारूचे व्यसन असून तो दारूचे नशेत धुंद होवून अर्जदारास वारंवार शिवीगाळ करून मारहाण करत असे. अर्जदाराने गैरअर्जअर्जदार क्र.३ यास विचारले की, 'भावजी तुम्ही मला रोज रोज का घाणेरड्या शिव्या देतात' त्यावरून त्यांनी अर्जदाराच्या पोटात, पाठीवर व मानेवर बेदम अत्यंत क्रुर व अमानुषपणे मारहाण केली असता अर्जदाराला नाशिक, उपनगर येथील हॉस्पीटल मध्ये तीन दिवस ॲडमिट व्हावे लागले. गैरअर्जदार क्र.३ यांनी अर्जदाराच्या पोटात लाथाबुक्यांनी मारहाण केल्यामुळे अर्जदाराची ओटी पोट दुखु लागले त्यामुळे अर्जदाराचे वडिलांनी उपनगर येथील हॉस्पीटल मध्ये औषधोपचार केला परंतू गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या तब्बेतीची कोणतीही विचारपुस केली नाही तसेच तिला बघण्यासाठी दवाखान्यात देखील आले नाही. अर्जदार ही दरम्यानचे काळात कुंदेवाडी वरून चार वर्षांनंतर जेलरोड, नाशिक येथे त्यांच्या फ्लॅटवर गैरअर्जदार व अर्जदार एकत्रीत राहणेसाठी आले परंतू गैरअर्जदारांचे वागण्यात काहीएक बदल झाला नाही परंतू अर्जदाराला घरसंसार करावयाचा असल्याने तीने गैरअर्जदारांचा त्रास निमुटपणे सहन केला. त्यानंतर अर्जदाराला तिच्या वडिलांनी नाशिक येथील घरी नांदणेकामी घेवून गेले त्यावेळेस गैरअर्जदार व अर्जदार यांच्यामध्ये समजुतपत्र तयार करून मी यापुढे अर्जदारास दारू रात्री बेरात्री लाथाबुक्यांनी मारझोड करणार नाही अथवा तिस मुलबाळ होत नाही यावरून भांडण करणार नाही अशी हमी दिली होती. परंतु तरी देखील गैरअर्जदार यांनी अर्जदारास पुन्हा शारिरिक, मानसिक व भावनिक त्रास देवून तिस

नेसत्या वस्त्रानुसार हाकलून दिले. अर्जदार पुढे असे कथन करते की, तिच्याकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही व ती तिचे पालन पोषण करण्यास समर्थ नाही. याउलट गैरअर्जदार क्र. १ कंपनीत कायमस्वरूपी कामाला असून त्यास दरमहा ४० ते ५० हजार रूपये पगार मिळतो. गैरअर्जदार क्र. २ ही देखील मनमाड येथे रेल्वे मध्ये कायमस्वरूपी नोकरीस असून तिस दरमहा ५० ते ६० हजार रूपये पगार मिळतो तसेच गैरअर्जदार क्र. ३ हा बजाज फायनान्स कंपनी नाशिक येथे कायमस्वरूपी नोकरीस असून त्यास देखील दरमहा ५० ते ६० हजार रूपये पगार मिळतो. गैरअर्जदार यांची मौजे कोठुळ, ता.निफाड, जि.नाशिक येथे शेती असून त्यापासून त्यांनी दरवर्षी १० ते १२ लाख उत्पन्न मिळते. गैरअर्जदार यांचे कुंदेवाडी घर असून व जेलरोड, नाशिक येथे स्वतःच्या मालकीचा फ्लॅट असून गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे तसेच गैरअर्जदार क्र.१ याचेवर अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणाचीही पालनपोषणाची जबाबदारी नाही. त्यामुळे ती गैरअर्जदारापासून दरमहा रक्कम रूपये १५,०००/– अन्नवस्त्र पोटगी व अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रूपये ३५,०००/– गैरअर्जदार यांचेकडून मिळण्याची प्रार्थना सदरहू अर्जातून करते.

२. सदर प्रकरणामध्ये हजर होवून देखील गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी म्हणणे व जवाब सादर न केल्याने गैरअर्जदार क्र.१ विरूद्ध **निशाणी क्र.१०** वर दिनांक २१/०२/२०२६ रोजी तसेच गैरअर्जदार क्र. २ व ३ विरूद्ध **निशाणी क्र.१** वर दिनांक २०/०३/२०२६ रोजी आदेश करून न्यायालयाने प्रकरण विना लेखी जवाब चालविण्याचा आदेश पारीत केला.

३. अर्जदाराच्या कथनांचा विचार करता माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारांच्या हातून कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरली आहे ? | होय |
| २ | अर्जदार सिध्द करते काय, की, ती अर्जात मागितलेल्या सर्व मागण्या मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होय |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ करीता:

**४.** अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले व अर्जदाराचा तिच्या विधिज्ञांमार्फत यूक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या बिनविरोध राहिलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता प्रथमसकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार ही अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहे. ज्याकरीता गैरअर्जदार यांच्या माध्यमातून होणारा कौटूंबिक छळ कारणीभूत आहे व अर्जदार ही गैरअर्जदारांच्या हातून कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरली आहे त्यामुळे मी **मूद्दा क्र.१ चे उत्तर होय** असे नोंदविले. संपूर्ण अभिलेखाचे व अर्जातील मजकूराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार क्र.१ हा महिण्याकाठी पूरेसे उत्पन्न मिळवतो त्यामुळे अर्जदाराचे पालनपोषण करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदाराची असल्याने व गैरअर्जदार ज्या जीवनशैलीत जगतो त्या जीवनशैलीत जगण्याचा अधिकार हा अर्जदाराचा देखील असल्याने ती गैरअर्जदाराच्या जीवनस्तराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी **मूद्दा क्र.२ चे उत्तर अंशत: होय** म्हणून नोंदवून **मूद्दा क्र.३** च्या उत्तरादाखल पूढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराचा प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कौटूंबिक छळ करू नये.

३. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रू.३,०००/- दरमहा अंतरिम पोटगी अर्ज दाखल करण्याच्या तारखेपासून प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

४. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

RAJKIRAN UTTAMRAO INGLE

Digitally signed by RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Date: 2026.03.30 16:10:46 +0530

(आर. यु. इंगळे)
**दिनांकः** ३०/०३/२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),**
**इगतपुरी**

**आदेशाची प्रत विनामूल्य प्राप्त झाली.**

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-
अर्जदार

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-
गैरअर्जदार